यवतमाळ येथे जुन्या महिला रुग्णालय परिसरात महिला व नवजात शिशू करीता १०० खाटांच्या नवीन इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखड्यांना सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय, क्रमांकः प्रशामा २०१७/प्र.क्र.२७८/आरोग्य ३

१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी. रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.

दिनांक : १४ जून, २०१९.

वाचा :

1. **सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.प्रशामा २०१४/प्र.क्र.१९६/ आरोग्य-३ दि.२४ जून, २०१५**
2. **आरोग्य सेवा संचालनालय यांचे पत्र क्रमांक : संआसे/कक्ष-३/टे-६/ यवतमाळस्त्रीरुवाढीवबांध/ १५३४-३५/१७, दिनांक २२.१०.२०१८.**

प्रस्तावना :

यवतमाळ येथे जुन्या महिला रुग्णालय परिसरात महिला व नवजात शिशू करीता १०० खाटांच्या नवीन इमारत बांधकामाच्या रु.१७,९९,४६,४१७/- लक्ष च्या अंदाजपत्रक व आराखडयांना शासन निर्णय दिनांक २४ जून, २०१५ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. यवतमाळ येथील महिला व नवजात शिशु रुग्णालयाचे बांधकाम चंद्रपूर येथील १०० खाटांच्या महिला व नवजात शिशु रुग्णालयाच्या नमुना नकशाप्रमाणे करावयाचे असल्याने यवतमाळ येथील १०० खाटांचे स्त्री रुग्णालयाचे वाढीव बांधकामाचे अंदाजपत्रक व नकाशांना सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होती. यासंदर्भात पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :

२. यवतमाळ येथे जुन्या महिला रुग्णालय परिसरात महिला व नवजात शिशू करीता १०० खाटांच्या नवीन इमारत बांधकामाच्या रु.३७,४६,३४,२९१/- च्या अंदाजपत्रक व आराखड्यांना पुढील प्रमाणे सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	बाब	मुळ प्रशासकीय मान्यता	सुधारीत प्रशासकीय मान्यात	फरक	अधिक्याची करणे
अ.	मूळ बाबी आकस्मिक खर्चासह	रु.१५,३१,८९,८३७	रु.२९,८४,२२,८१६	रु.१४,५२,३२,९७९	इमारतीचे काम सुरु झाल्यानंतर इमरत बांधकाम करण्यासाठी जोत क्षेत्रफळ व दरपत्रक यामध्ये वाढ झाल्यामुळे सुधारीत अंदाजपत्रकाच्या किंमतीच्या तुलनेत वाढ झाली आहे
	एकूण अ	रु.१५,३१,८९,८३७/-	रु.२९,८४,२२,८१६/-	रु.१४,५२,३२,९७९/-	
ब.	विद्युत				विद्युत विभागाने कळविल्यानुसार व नव्याने अंतर्भूत केल्यामुळे वाढ झाली आहे.
	१. मुळ बाब	रु.२,१५,२८,२९०/-	रु.५,६३,८८,९४६/-	रु.३,४८,६०,६५६/-	
	२.नवीन बाबी	.....	रु.९,५५,६१,२१/-	रु.९५,५६,१२१/-	
	एकूण ब	रु.२,१५,२८,२९०/-	रु.६,५१,४५,०६७/-	रु.४,४४,१६,७७७/-	
क.	पाणी पुरवठा				नव्याने अंतर्भूत केल्यामुळे
	१. मुळ बाब	रु.५२,२८,२९०/-	रु.८७,७४,७०७/-	रु.३५,४६,४१७/-	
	२.नवीन बाबी	....	रु.१४,९१,७०१/-	रु.१४,९१,७०१/-	
	एकूण क	रु.५२,२८,२९०/-	रु.१,०२,६६,४०८/-	रु.५०,३८,१२४/-	
एकूण अ+ब+क		**रु.१७,९९,४६,४१७/-**	**रु.३७,४६,३४,२९१/-**	**रु.१९,४६,८७,८७४/-**	**अधिक्य**

<u>अटी व शर्ती :-</u>

१) कामासाठी निविदा मागविण्याआधी सदर कामास सार्वजनिक बांधकाम विभागातील सक्षम अधिकाऱ्यांची तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक राहील.

२) कामासाठीच्या जागेची उपलब्धता, योग्यता व जागा पुरेशी आहे किंवा नाही याबाबतची खात्री संबंधित आरोग्य संस्था प्रमुखांनी करावी.

३) क्षेत्रिय जागेच्या परिस्थितीनुसार व आरोग्य संस्थांच्या आवश्यकतेनुसार प्रस्तावित कामाची किंमत वाढणे शक्य असल्यामुळे त्यासाठी आवश्यक प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाच्या त्यात्या- भागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून करुन घ्यावेत.

४) सदरचे अंदाजपत्रक हे ढोबळ नमुना अंदाजपत्रक असल्याने, या कामांच्या सविस्तर अंदाजपत्रकांना तांत्रिकदृष्ट्या मान्यता ही सार्वजनिक बांधकाम खात्याच्या त्यात्या- क्षेत्राच्या सक्षम अधिकाऱ्यांकडून देण्यात यावी. अशी तांत्रिक मान्यता देतांना आरोग्य खात्याच्या त्यात्या- आरोग्य सेवा मंडळाच्या उप संचालकांच्या सहमतीने तरतुदी अंतिम करण्यात याव्यात.

५) सदरचे काम नवीन नमुना नकाशांप्रमाणे करावयाचे झाल्यास सार्वजनिक आरोग्य विभागाने नियुक्त केलेल्या खाजगी वास्तुशास्त्रज्ञामार्फत नकाशांप्रमाणे वास्तुमांडणी आराखडा मंजूर करुन घेण्यात यावा. तसेच स्थानिक ग्रामीण नगर विकास संस्थेच्या संबंधित नियमानुसार

बांधकाम परवानगी तसेच भोगवटा प्रमाणपत्र मिळविण्याची जबाबदारी सदर नवनियुक्त वास्तुशास्त्रज्ञ व जिल्हा शल्य चिकित्सक यांची राहील. तसेच ही परवानगी मागण्यासाठीचा पत्रव्यवहार जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या स्वाक्षरीने करण्यात यावा.

६) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य/ उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञाकडून या कामांच्या नकाशे व वास्तुमांडणी आराखड्यांना वेगळ्या मंजूरीची आवश्यकता नाही.

७) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क.१ दि. १० जानेवारी,२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

३. सदर बांधकामावरील खर्च मागणी क्रमांक- एच- ८, मुख्यलेखाशिर्ष ""४२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य सेवा यावरील भांडवली खर्च, ०१- नागरी आरोग्य सेवा (वैद्यकीय सहाय्य-(पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- इमारती, ११०- रुग्णालय व दवाखाने, (१)(अ(पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- इमारती, (००)(०१) मोठी बांधकामे (४२१०००१४), ५३- मोठी बांधकामे" याखाली मंजुर करण्यात आलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. हे आदेश, शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक- विअप्र २०१३/प्र.क्र.३०/विनियम, दिनांक १७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्ट, भाग पहिला, उपविभाग-पाच मधील अनुक्रमांक-१, परिच्छेद क्रमांक- १३४ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय उच्चस्तरीय सचिव समितीने दिनांक १०.०६.२०१९ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार व सर्वजनिक बांधकाम विभागाने त्याअनुषंगाने निर्गमित बैठकीच्या इतिवृत्तानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१३१७२८३८५३१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2019.06.14 15:12:09 +05'30'

(रो.दि.कदम-पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र- १/ २ (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.

२. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
३. संनियंत्रक तथा मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती.
४. सह संचालक, आरोग्य सेवा (रुग्णालये), मुंबई.
५. उप संचालक, आरोग्य सेवा मंडळ, अकोला.
६. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णलय, यवतमाळ.
७. अधिक्षक, स्त्री रुग्णालय, यवतमाळ.
८. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, यवतमाळ.
९. उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, यवतमाळ.
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, जि. यवतमाळ.
११. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२), मंत्रालय, मुंबई.
१२. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. निवडनस्ती (आरोग्य-३).